# Indian Streams Research Journal

International Recognized Multidisciplinary Research Journal

ISSN : 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume -6 | Issue - 2 | March - 2016


# शिक्षण शास्त्र महाविद्यालय (बी.एड) छात्राध्यापकांना इतिहास विषयाच्या सराव पाठ घेताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास




डॉ. कृष्णा पुंजाराम भदाणे

राजर्षी शाहू कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड) ताथवडे पुणे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.


**प्रस्तावना :-**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बी.एड.) ऐच्छिक विषयाव्यतिरिक्त आणखी एक विषय हा अध्यापनासाठी घ्यावा लागतो. ज्या विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमाला इतिहास हा विषय अध्यापनासाठी असतो त्या विद्यार्थ्यांना इतिहास विषय शैक्षणिक साधनातील नकाशाचे पुरेसे ज्ञान असते. परंतु ज्या छात्राध्यापकांनी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात द्वितीय पद्धतीसाठी इतिहास या विषयाची निवड केलेली असते. त्या छात्राध्यापकांना इतिहास विषयाचे सरावपाठ घेताना नकाशाचे विषयज्ञान कमी असल्यामुळे समस्या येतात.

इतिहास विषय अध्यापनात नकाशाचे महत्त्व फार आहे. इतिहासाच्या अध्यापनात ऐतिहासिक नकाशे अधिक उपयुक्त असतात. इतिहास म्हणजे काय घडले ते, पण ते कोठे घडले हे सांगण्यासाठी, घटनेची स्थान निश्चिती करण्यासाठी नकाशाची

गरज लागते. उदा. विविध राज्यांच्या व क्षेत्रांच्या सीमाही नकाशानेच स्पष्ट होतात. युद्ध क्षेत्रांचे नकाशे युद्धांच्या हालचाली व शत्रुपक्षांची माहिती मिळविण्यासाठी उपयोगी ठरतात.

## गरज व महत्त्व :-

इतिहास विषयाच्या शिक्षकांना उपयोगी पडणारे असे अतिशय महत्त्वाचे साधन म्हणजे नकाशा होय. नकाशा शिवाय इतिहासाचा पाठ पूर्ण होऊच शकत नाही. त्यासाठी इतिहास अध्यापनातील एक प्रमुख साधन म्हणून नकाशाचा उपयोग होतो. घटक, उपघटक पाठ्यांश व महत्त्वाच्या घटना मुद्दे स्पष्टीकरणासाठी नकाशा अत्यंत उपयुक्त ठरतो. नकाशामुळे निश्चित स्थळ, दिशा व सीमा रेषा स्पष्टपणे समजून येतात. तसेच अध्यापन प्रभावी होऊन पाठात रंजकता येते व विषयांश जिवंत करता येतो.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक शाळेत इतिहास विषयाचे सराव पाठ घेत असताना प्रस्तुत समस्या संशोधकाच्या निरीक्षणात आली. छात्राध्यापक इतिहास विषयाची सर्व पाठ घेत असताना शैक्षणिक साहित्याचा वापर करत असताना नकाशाच वापर करतात. परंतु या नकाशाची संपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याने छात्राध्यापकांकडून घेणारे नकाशा वाचणे योग्य व अचूक होत नाही ही बाब संशोधकाच्या लक्षात आल्याने तसेच या होणाऱ्या चुकांच्या पाठीमागची कारणे शोधण्यासाठी संशोधकाने या समस्येची निवड केली.

## संशोधनाची उद्दिष्टे

1. नकाशातील विविध अंगाची माहिती देणे.
2. सराव पाठ घेत असताना नकाशा वाचनासाठी मिळणाऱ्या मार्गदर्शनाचा शोध घेणे,
3. नकाशा वाचनात येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

## संशोधनाची गृहितके

1. इतिहासात विषयांत नकाशांची गरज असते.
2 नकाशामुळे ऐतिहासिक बारकावे चटकन लक्षात येतात.
3. छात्राध्यापकांना नकाशाची संपूर्ण माहिती नसते.

## व्याप्ती व मर्यादा :-

1. प्रस्तुत संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील इतिहास विषयाचे सराव पाठ घेणाऱ्या छात्राध्यांपका पुरतेच मर्यादित आहे.
2 प्रस्तुत संशोधन हे जयवंतराव सावंत कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड.) हडपसर, पुणे या शिक्षणशास्त्र महाविद्यालया पुरतेच मर्यादित आहे.
3. प्रस्तुत संशोधन इतिहास विषयातील नकाशा वाचन प घटका पुरतेच मर्यादित आहे.

## जनसंख्या:-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने इतिहास विषयाचे सराव पा घेणाऱ्या छात्राध्यापकांची निवड केली जाते.

## न्यादर्श:-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने २० छात्राध्यापकांची प्रासंगिक नमुना निवड पद्धतीनुसार निवड केली आहे.

### माहिती संकलनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने माहितीचे वर्गीकरण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला आहे.

### निष्कर्ष :-

1. नकाशामधील विविध घटकांसाठी असलेल्या वेगवेगळ्या खूणा व चिन्हे यामुळे नकाशा वाचन करताना समस्या निर्माण होतात.

2 निश्चित स्थळ, दिशा व सीमा रेषा स्पष्ट करताना समस्या निर्माण होतात.

3. नकाशा मधील ठिकाण, सीमा याबद्दल ज्ञान नसल्याने नकाशा वाचन करताना अडचणी निर्माण होतात.

4. नकाशातील तुलनात्मक नकाशे दाखवताना समस्या निर्माण होतात.

5 युद्धाची ठिकाण, सैन्यरचना इत्यादी स्पष्ट करताना पुरेसे ज्ञान नसल्याने नकाशातील संपूर्ण माहिती सांगता येत नाही.

1. नकाशा वाचन करताना आवश्यक माहिती घ्यावी.
2. एखादा घटक शिकविताना नेहमी नकाशाचा वापर करावा.
3. नकाशा दाखवताना योग्य वातावरण निर्माण करावे.
4. नकाशा दाखवताना विद्यार्थ्यांना कृतिशील ठेवावे.
5. नकाशा वाचन करताना अध्यापनाची गोडी विद्यार्थ्यांमध् निर्माण करावी.

### संदर्भ

1. मुळे रा.शं.उमाठे वि.तु. "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे" नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

2 डॉ. भिंताडे वि.रा. "शैक्षणिक संशोधन पद्धती" पुणे : नित्य नूतन प्रकाशन.

3. डॉ. शिवाजी माधवराव सगर "इतिहास, नागरिक शासन व प्रशासन" पुणे : सुविचार प्रकाशन मंडळ.

4. डॉ. विलास रणसुरे "इतिहास आशयुक्त अध्यापन" मिरज : संघमित्रा प्रकाशन

5. प्रा. संदीप पाटील "इतिहास शिक्षण एक आधुनिक दृष्टिकोन" नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स्.